ePaper

# शिंदे सरकार कुणाच्या दबावाखाली झुकले?: अजित पवार



| वर्ष - 6 | अंक - 157 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- मासेमारीसाठीच्या ठेक्यांमध्ये स्थानिक सहकारी संस्थांना प्राधान्य
- पाणीपुरवठा 'दिवसाआडच'!
- 'वेदान्त-फॉक्सकॉन' गुजरातला गेल्याने शिवसेनेचा संताप

www.mahaenews.com | शुक्रवार | दिनांक 16 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## छत्रपती संभाजी महाराज जागतिक दर्जाच्या स्मारक आराखड्याला मुख्यमंत्र्यांची मंजुरी!

# 'स्वराज्यरक्षक' ऐवजी 'धर्मवीर'!

## सर्वात मोठ्या वादाच्या मुद्द्यावर मुख्यमंत्र्यांनी थेट सुधारीत आराखड्याचे दिले आदेश

**। पुणे ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत येताच मंजूर विकासकामे रद्द करण्याच्या राजकीय घमासानामध्ये छत्रपती संभाजी महाराज जागतिक दर्जाच्या स्मारकाला स्थगिती हा वादाचा मुद्दा ठरला होता. शिंदे-फडणवीस सरकार मंजूर कामे रद्द करण्यावरुन छत्रपती संभाजी महाराजांच्या विकास आराखड्याबाबतीत झालेल्या सर्वात मोठ्या वादाच्या मुद्द्यावर आज मुख्यमंत्र्यांनी थेट सुधारीत आराखड्याचे आदेश दिले. यात विशेष बाब म्हणजे या बैठकीत पूर्वीच्या आराखड्यात समाविष्ट असलेले स्वराज्यरक्षक या नावाऐवजी सुधारीत आराखड्याला धर्मवीर अशी



उपाधी जोडली आहे. यामुळे एकाच वेळी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार व खासदार डॉ.अमोल कोल्हे या दोघांनाही शह दिल्याचे बोलले जात आहे.

गुरुवारी झालेल्या बैठकीत संभाजी महाराजांचा उल्लेख स्वराज्यरक्षक ऐवजी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज असा करून छत्रपती संभाजी महाराज जागतिक दर्जाच्या स्मारकाचा सुधारीत आराखडा तात्काळ बनवून, मंजुरीसह या कामाला लवकर प्रारंभ करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. त्याचप्रमाणे शिरुरमधील इतर महत्वाचे प्रश्नही मार्गी लावण्याच्या सूचना शिंदे यांनी दिले. यामुळे आजची बैठक शिरुर लोकसभा मतदार संघासाठी निर्णायक ठरली. बिबट्या सफारी प्रकल्पाला मुख्यमंत्र्यांनी आंबेगव्हाण (ता.जुन्नर) येथेच करण्याचे आदेश दिले. यावेळी सुधारीत विकास आराखड्यात गावाला आणि ग्रामस्थांना सहभागी करुन घ्यावे या विनंतीला होकार देणा-या मुख्यमंत्र्यांनी, वढु बुद्रुक ग्रामस्थांशी चौकशी करुन स्थानिक माहितीही घेतली. यानंतर ग्रामस्थांनी दिलेल्या २१ मार्च रोजी होणा-या धर्मवीर संभाजी महाराज पुण्यतिथीच्या कार्यक्रमाला येण्याचे निमंत्रण मुख्यंत्र्यांनी स्विकारले.

### सुधारीत आराखड्याला तात्काळ सादर करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश

शिरुर लोकसभा मतदार संघातील महत्वाच्या प्रश्नांच्या अनुषंगाने शिवाजीराव आढळराव व जुन्नरचे माजी आमदार शरद सोनवणे यांच्या निवेदनांनुसार यावर निर्णय झाला. प्रधान सचिवांसह सर्व खात्यांचे अपर मुख्य सचिव उपस्थिती होते. सर्वप्रथम वढु बुद्रुक येथील छत्रपती संभाजी महाराज यांचे जागतिक दर्जाच्या स्मारकाचा सुधारीत आराखडा तात्काळ अद्ययावत करा, स्थानिक कृती समितीच्या सुचनांचा विशेष सहभाग करा, स्मारकाला निधी कमी पडू देवू नये, ग्रामस्थांना आराखड्यात सहभाग व स्थान द्यावे, स्वराज्यरक्षक ऐवजी धर्मवीर असाच उल्लेख या पुढे व्हावा, अशा सूचना करुन या सुधारीत आराखड्याला तात्काळ सादर करण्याचे आदेश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.

---

# खासदार कोल्हेंना त्यांच्या कार्यालयाकडे जाणारा रस्ताही करता आला नाही!

## केंद्रीय मंत्री रेणुका सिंह यांची खासदार अमोल कोल्हें यांच्यावर नाव न घेता टीका

**। पुणे । महाईन्यूज ।**

जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी शिरूरमधील मतदारांनी निवडणूक दिलेले येथील खासदार जनतेत नाहीत. त्यांना त्यांच्या कार्यालयाकडे जाणार रस्ता करता येत नाही, अशी टीका केंद्रीय मंत्री तथा शिरूर लोकसभा मतदारसंघाच्या भाजपच्या प्रभारी रेणुका सिंह यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार डॉ अमोल कोल्हे यांच्यावर नाव न घेता केली आहे. दरम्यान, खासदार कोल्हे यांनी रेणुका सिंह यांच्या टीकेला उत्तर दिले आहे. केंद्रीय मंत्री सिंह यांनी टीका करण्यापेक्षा राज्यातील त्यांच्या विचाराच्या सरकारला निधी देण्याची सूचना करावी, असे म्हटले आहे. भाजप कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचे नारायणगाव (ता. जुन्नर) येथे करण्यात आले होते. त्या मेळाव्या बोलताना केंद्रीय मंत्री सिंह यांनी खासदार कोल्हे यांच्यावर टीका केली. या वेळी आमदार माधुरी मिसाळ, माजी आमदार योगेश टिळेकर, आशा बुचके, एकनाथ पवार ,जिल्हा अध्यक्ष गणेश भेगडे, विघ्नरचे संचालक संतोष खैरे, सरपंच राजेंद्र मेहेर, उपसरपंच माया डोंगरे, वंदना कोंदरे, धर्मेंद्र खांडरे, शरद बुट्टे पाटील, अर्चना माळवदकर आदी उपस्थित होते.



देशातून इंग्रज गेले मात्र बाबूशाही सुरू आहे. शासकीय अधिकारी व कर्मचारी सर्वसामान्यांची अडवणूक करत असतील तर लोकप्रतिनिधींनी लक्ष देणे आवश्यक आहे. प्रशासन, राज्य व केंद्र सरकार यांचा समनव्यय साधून शिरूर लोकसभा मतदारसंघातील सर्व समस्या सोडविण्यात येईल. कांदा प्रश्न सोडवण्यासाठी कृषी मंत्री नरेंद्र तोमर यांच्याशी चर्चा करणार आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघात कमळ फुलवण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आवाहनही रेणुका सिंह यांनी केले. सिंह म्हणाल्या की, माहिती घेण्यासाठी मी आले आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी, सर्वसामान्यांचे प्रश्न , समस्या जाणून त्या सोडवणे हे लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे. भाजपच्या कार्यकर्त्यांनी राज्य व केंद्र सरकारच्या योजनांचा अभ्यास करून या योजनांचा लाभ सर्वसामान्यांना कसा देता येईल याची माहिती घ्यावी. केंद्रीय मंत्री रेणुका सिंह यांनी केवळ राजकारण कारणापोटी टीका करण्यापेक्षा राज्यात त्यांच्या विचाराचे सरकार आहे.

### राज्य सरकारला सूचना द्या : अमोल कोल्हे

**दरम्यान, केंद्रीय मंत्री सिंह यांच्या टीकेला उत्तर देताना खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, मी केंद्रीय मंत्री रेणुका सिंह यांच्या निर्दशनास मी एक बाब आणून देऊ इच्छितो की अष्टविनायक महामार्गापैकी राज्य सरकारच्या अखत्यारित असलेला हा रस्ता आहे. कोल्हे मळ्यातील जो रस्ता आहे, तेथील स्थानिक भूमिपुत्रांना त्यांचा जमिनीचा मोबदला मिळालेला नाही. त्यासाठीचा २५ कोटी रुपयांचा निधीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रलंबित आहे.**

# मासेमारीसाठीच्या ठेक्यांमध्ये स्थानिक सहकारी संस्थांना प्राधान्य!

## मत्स्य व्यवसाय विभागाचा निर्णय

। पुणे। महाईन्यूज ।

महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाकडे मासेमारी हक्क हस्तांतरित केलेल्या जलाशयांमध्ये मासेमारीचे ठेके देताना स्थानिक सहकारी संस्थांना प्राधान्य देण्याचा निर्णय सरकारने घेतला असून, या बाबतचा शासन आदेश नुकताच जारी करण्यात आला आहे. महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाकडे मासेमारी हक्क हस्तांतरित केलेल्या जलाशयांमध्ये मासेमारीचे ठेके देताना स्थानिक सहकारी संस्थांना प्राधान्य देण्यात यावे. ई-निविदा प्रक्रियेत या संस्थांना प्राधान्य मिळावे, अशीही मागणी संबंधित संस्थांनी राज्य सरकारकडे केली होती. मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही मागणी मान्य करण्यात आली असून, तसे आदेश संबंधितांना देण्यात आले आहेत.

आदेशात म्हटले आहे,की सहकार क्षेत्राचे बळकटीकरण करण्यासाठी महामंडळाकडे



**मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी बैठक सुरु असतानाच केंद्रीय रेल्वेमंत्री अमहाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाकडे मासेमारी हक्क हस्तांतरित केलेल्या जलाशयांमध्ये मासेमारीचे ठेके देताना स्थानिक सहकारी संस्थांना प्राधान्य देण्यात यावे. ई-निविदा प्रक्रियेत या संस्थांना प्राधान्य मिळावे, अशीही मागणी संबंधित संस्थांनी राज्य सरकारकडे केली होती. मत्स्य व्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही मागणी मान्य करण्यात आली असून, तसे आदेश संबंधितांना देण्यात आले आहेत.**

मासेमारी हक्क हस्तांतरित केलेल्या जलाशयांमध्ये मासेमारीचे ठेके देताना ई-निविदा प्रक्रियेत स्थानिक सहकारी संस्थांना प्राधान्य दिले जावे. निविदा उघडल्यानंतर सर्वोच्च बोलीपेक्षा २० टक्के सवलत देऊन स्थानिक संस्था ठेका घेण्यास तयार असतील, तर त्या स्थानिक संस्थेला ठेका देण्यात यावा. एकापेक्षा जास्त संस्था पात्र आणि इच्छुक असतील तर जास्त बोली असलेल्या संस्थेला ठेका द्यावा, असेही आदेशात म्हटले आहे. या आदेशाची प्रत सर्व संबंधित कार्यालये आणि अधिकाऱ्यांना पाठविण्यात आली आहे.



# अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात साडेपाच हजार हेक्टरवर नुकसान

## 20 हजार कोंबड्या मृत; 83 घरांची पडझड

। पुणे। महाईन्यूज ।

जिल्ह्यात सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात आठ तालुक्यांमध्ये ६५ मिलिमीटरपेक्षा अधिक पावसाची नोंद झाली आहे. या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील साडेपाच हजार हेक्टरवरील शेतपिकांचे नुकसान झाले असून ८३ घरांची पडझड झाली आहे. याशिवाय एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून रस्ते, बंधारे वाहून गेले आहेत. तसेच नऊ जनावरांच्या मृत्यूची नोंद झाली असून तब्बल २० हजार कोंबड्या दगावल्या आहेत. या नुकसानीचे पंचनामे करण्यात येत असून नुकसान भरपाईसाठी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सांगण्यात आले जिल्ह्यातील बारामती तालुक्यात १ ते ८ सप्टेंबर या कालावधीत ४१ घरांची पडझड झाली असून दोन शेळ्या, एक बोकड, आठ हजार कोंबड्या दगावल्या आहेत. तसेच १०२ हेक्टरवरील शेतपिकांचे नुकसान झाले आहे. तसेच मोरगावमधील खटकळी ओढ्यावरील बंधारा वाहून गेला आहे. जुन्नर तालुक्यात सहा घरांची पडझड झाली असून सोमतवाडी येथे पाच हजार कोंबड्या, ओतूर येथे ६६०० आणि पिंपरी पेंढार येथे १२७५ कोंबड्यांचा मृत्यू झाला आहे. वेल्हा तालुक्यात २६ घरांची पडझड झाली असून एक जनावर दगावले आहे. खेड तालुक्यात तीन घरांची पडझड झाली असून पुरंदर तालुक्यात सात घरांचे नुकसान झाले आहे. तसेच तीन शेळ्या, दोन जनावरे आणि ४००० कोंबड्या दगावल्या आहेत.

# पुण्यात बिजनेस प्रोमोट करण्याची पुन्हा सुवर्णसंधी!

## स्टाईल एलिट तर्फे दिवाळी शॉपिंग अँड फूड फेस्टिवलचे आयोजन

। पुणे। महाईन्यूज ।

उन्हाळ्यातील उदंड प्रतिसादानंतर स्टाईल एलिटच्या वतीने दिवाळी शॉपिंग अँड फूड फेस्टिवलचे आयोजन करण्यात येणार आहे. ऑक्टोबर महिन्यातील ७, ८ आणि ९ रोजी एल. एम. डी. चौकातील आठवडे बाजारच्या मैदानावर या शॉपिंग अँड फूड फेस्टिवलचे आयोजन होणार असून ६५ हुन अधिक व्यावसायिक या मध्ये सहभाग घेणार आहेत. झपाट्याने विकसित होणाऱ्या बावधन वासियांसाठी येथे खरेदीबरोबरोच खाण्यापिण्याचाही आस्वाद घेता येणार आहे. या ठिकाणी



व्यासायिकांना त्यांचा बिजनेस प्रोमोट करण्याची संधी भेटणार आहे.

स्टाईल एलिटचा शॉपिंग अँड फूड फेस्टिवल हा बावधनकारांसाठी आनंदाची पर्वणीच असते. या शॉपिंग अँड फूड फेस्टिवलला बावधनकर भरभरून प्रतिसाद देत असतात. यातून मोठ्या संख्येने व्यावसायिकांच्या उद्योग धंद्याच्या वाढीस चालना मिळत असते. हे वारंवार दिसून येत आहे. आपणही या शॉपिंग अँड फूड फेस्टिवल मध्ये




सहभागी होऊन आपला व्यवसाय बावधन परिसर वाढवू शकता. या परिसरातील लोक मोठ्या संख्येने या शॉपिंग अँड फूड फेस्टिवलला भेट देत असतात. या मध्ये स्टॉल हवा असल्यास जिगीशा: ९८३४८८५०८९, निकिता: ९२२५५७७५८६ या नंबर वर संपर्क करावा. या माध्यमातून नक्कीच आपल्या व्यवसायाला बावधन परिसरातून चालना मिळेल.

### शॉपिंगची संधी अन् कार्यक्रमांची धम्माल...

या ठिकणी एकाच छताखाली सर्वांना आवडणाऱ्या आणि परवडणाऱ्या वस्तू आपणास खरेदी करण्यात येणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने बनारसी साड्या, चंदेरी साड्या, कांजीवरम, पैठणी, दिवाळीच्या शोभेच्या वस्तू, ज्वेलरी, पंजाबी सूट्स, प्लाझो, फाब्रिक डिझाईनर साड्या, रेडी टू वेअर ब्लाऊज, कॉटन मेन्स शर्ट्स आणि किड्स वेअर, सुगंधी हॅन्डमेड सोप, ब्युटी प्रॉडक्ट्स, खान्देशी केळीचे वेफर्स, शेंगदाणा गुळपट्टी, शोभेच्या वस्तू, सोलापुरी चादर, महिला बचत गटांनी तयार केलेल्या दर्जेदार वस्तू, लोणच्यांचे विविध प्रकार, दर्जेदार गावरान आणि घरगूती मसाले, पापड कुर्डाई, शोभेच्या वस्तू, रेडी टू कुक फूड्स, मातीची भांडी, बेडशीट असे स्टॉल असणार आहेत. त्याच बरोबर खाद्य पदार्थांची रेलचेलही असणार आहे. विशेष म्हणजे थोरा-मोठ्यांबरोबरच लहान मुलांच्या करमणुकींसाठी पपेट शो, जादूचे प्रयोग, आणि गाण्यांचे कार्यक्रमही होणार आहेत.

### पवना बंदिस्त जलवाहिनीबाबत तोडगा काढण्याचे प्रयत्न – आयुक्त शेखर सिंह

# पाणीपुरवठा ‘दिवसाआडच’!

### शेतकऱ्यांना विश्वासात घेऊ, राज्य सरकारशी चर्चा करुन तोडगा काढण्याची ग्वाही

**। पिंपरी-चिंचवड ।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**मावळातील शेतकऱ्यांना विश्वासात आणि लोकप्रतिनिधींना सोबत घेऊन राज्य सरकारशी चर्चा करुन तोडगा काढण्यासाठी प्रयत्न केले जाणार असल्याचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सांगितले. दररोज पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु आहे. परंतु, आणखी काही दिवस दिवसाआडच पाणीपुरवठा सुरु राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे धरण 100 टक्के भरले असतानाही शहरवासीयांना दिवसाआडच पाणी पुरवठ्याला सामोरे जावे लागणार आहे.**



**महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सांगितले. दररोज पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु आहे. परंतु, आणखी काही दिवस दिवसाआडच पाणीपुरवठा सुरु राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे धरण 100 टक्के भरले असतानाही शहरवासीयांना दिवसाआडच पाणी पुरवठ्याला सामोरे जावे लागणार आहे.**

महापालिका आयुक्त सिंह यांनी आज (गुरुवारी) पत्रकारांशी संवाद साधला. उपायुक्त अजय चारठणकर, रविकिरण घोडके, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे उपस्थित होते. तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी समन्यायी पाणी वाटपाचे कारण देत 25 नोव्हेंबर 2019 पासून एकदिवसाआड पाणीपुरवठा सुरु केला होता. त्याला तीन वर्षे पूर्ण होत आले तरी दिवसाआडच पाणीपुरवठा सुरु आहे. पवना धरण 100 टक्के भरल्याने दररोज पाणीपुरवठा होईल अशी अपेक्षा असलेल्या शहरवासीयांची पुन्हा निराशा झाली आहे.

पवना धरण 100 टक्के भरले असतानाही पिंपरी-चिंचवडकरांना दिवसाआड पाणीपुरवठा केला जात असल्याबाबत विचारले असता आयुक्त सिंह म्हणाले, मागील तीन वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे.

दिवसाआड पाणीपुरवठा होत असला तरी दैनंदिन पाण्यात कपात केली नाही. दिवसाला 510 एमएलडी पाणी दिले जाते. दररोज पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरु आहे. भविष्याचा विचार करुन नियोजन केले जात आहे. आंद्रा, भामा-आसखेडच्या पाणी आरक्षणासह इतर कारणांमुळे प्रकल्प रखडला.

महापालिकेने खड्डे बुजविले आहेत. काही रस्त्यांवर खड्डे आहेत. त्याबाबत दुमत नाही. सध्या पाऊस सुरु आहे.15 ऑक्टोबरनंतर खड्डे बुजविण्याचे काम हाती घेणार आहे. रस्त्यावर खड्डा पडल्यावर त्याला जबाबदार कोण, त्याचा दर्जा कोण तपासणार याबाबतचे धोरण ठरविण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



#### पुढील काही दिवसआडच पाणीपुरवठा

**समाविष्ट गावातील पाणीपुरवठा सक्षम करण्यासाठी आंद्रा 100 आणि भामा आसखेड प्रकल्पातून 167 असे 267 दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी घेतले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात आंद्रा धरणातून 100 एमएलडी पाणी आणण्यात येणार आहे. त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. चिखली जलशुद्धीकरण केंद्रातून पाणीपुरवठा केला जाणार आहे. त्यामुळे पाण्याची परस्थिती सुधारण्यास मदत होईल. रखडलेल्या पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाबाबतही तोडगा काढण्यात येईल. त्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. पाण्याच्या दृष्टीने वाटचाल सुधारत जाईल तसे दररोज पाणीपुरवठा करण्याबाबत पाऊले उचलली जातील. पण, पुढील काही दिवस दररोज पाणीपुरवठा होणार नाही. दिवसाआडच पाणीपुरवठा केला जाईल, असेही आयुक्तांनी स्पष्ट सांगितले.**

---

## जाधववाडी परिसरात ड्रेनेजयुक्त पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

### वारंवार तक्रार करुनदेखील महापालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

जाधववाडी परिसरातील वडाचा मळा भागातील विहीरीमध्ये ड्रेनेजयुक्त पाणी येत असल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिकेकडे वारंवार तक्रार करुनदेखील हा प्रश्न सोडवला जात नसल्यामुळे दाद कुणाकडे मागायची असा प्रश्न नागरिकांसमोर निर्माण झाला आहे. ड्रेनेजयुक्त पाणी स्टॉं मोटर लाईनला जोडले आहे. त्या पाण्याची गळती विहिरीमध्ये होत आहे. त्यामुळे येथील स्थानिक नागरीकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

**महापालिकेकडे वारंवार तक्रार करुनदेखील हा प्रश्न सोडवला जात नसल्यामुळे दाद कुणाकडे मागायची असा प्रश्न नागरिकांसमोर निर्माण झाला आहे. ड्रेनेजयुक्त पाणी स्टॉं मोटर लाईनला जोडले आहे. त्या पाण्याची गळती विहिरीमध्ये होत आहे. त्यामुळे येथील स्थानिक नागरीकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.**

शहरात पिण्याच्या पाण्याची समस्या तीव्र आहे. जाधववाडी परिसरातील रहिवाशी विहिरीच्या पाणी पिण्यासाठी वापर करतात. ड्रेनेजयुक्त पाणी विहिरीत जात असल्यामुळे हे पाणी दूषीत झाल्याने



> अद्यापही हे चॉकअप काढलेले नाही. ड्रेनेजयुक्त पाणी विहिरीत जात असल्यामुळे पिण्याचे पाणी दूषीत झाल्याने आमच्या आरोग्यास धोका आहे. महापालिकेने लवकरात लवकर याकडले लक्ष द्यावे.
> **- विनायक जाधव,** स्थानिक नागरिक

> ड्रेनेजचे चॉकअप काढण्याचे काम सर्वत्र सुरू आहे. मात्र आरोग्य आणि स्थापथ्य विभागाकडून हे काम अद्याप झालेले नाही. या विभागांकडून हे काम झाल्यास चॉक अपचे काम मार्गी लागेल.
> **- अमोल धडक,** कनिष्ठ अभियंता, क प्रभाग

नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. येथील स्थानिक रहिवाशांनी याची तक्रार पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेच्या सारथी हेल्पलाईनद्वारे केलेली आहे. मात्र अद्याप हा प्रश्न निकाली काढला गेला नाही. क प्रभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले की, शहरात ड्रेनेज चॉकअप काढण्याचे काम सर्वत्र सुरू आहे. मात्र आरोग्य आणि स्थापथ्य

## संपादकीय »

# ऱ्हासपर्वाचा नवा अध्याय

***महाराष्ट्राचा चहूबाजूंनी जो ऱ्हास सातत्याने चालू आहे; त्यातील नवा अध्याय म्हणून वेदान्त-फॉक्सकॉनच्या गुजरात गमनाकडे पाहावे लागेल. वेदान्त या भारतीय कंपनीने परदेशी कंपनीच्या सहकार्याने भारतात सेमी-कंडक्टर म्हणजे विद्युत प्रवाहाचे अर्धवाहक बनविण्याचा प्रस्ताव सात वर्षे जुना आहे***

महाराष्ट्राचा चहूबाजूंनी जो ऱ्हास सातत्याने चालू आहे; त्यातील नवा अध्याय म्हणून वेदान्त-फॉक्सकॉनच्या गुजरात गमनाकडे पाहावे लागेल. वेदान्त या भारतीय कंपनीने परदेशी कंपनीच्या सहकार्याने भारतात सेमी-कंडक्टर म्हणजे विद्युत प्रवाहाचे अर्धवाहक बनविण्याचा प्रस्ताव सात वर्षे जुना आहे. २०१५ मध्ये हा प्रस्ताव प्रथम महाराष्ट्राच्या दिशेने आला, तेव्हा ॲपल कंपनी वेदान्तची भागीदार असणार होती. पुढे ती योजना फिसकटून तेथे फॉक्सकॉन ही तैवानी कंपनी आली. इतर अनेक राज्ये स्पर्धेत असूनही महाराष्ट्राचे नाव बराच काळ अग्रभागी होते. मात्र, आता 'वेदान्त'ने गुजरात सरकारशी करार केल्याने महाराष्ट्राची संधी कायमची गेली आहे. तेथे आता दीड लाख कोटींहून अधिक रुपयांचा हा प्रकल्प दोन लाख प्रत्यक्ष आणि कित्येक लाख अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करील. महाराष्ट्र याला मुकला. गुजरात-वेदान्त सामंजस्य कराराची बातमी आल्यापासून महाराष्ट्रात जी राजकीय धुळवड चालू आहे; तिचा अर्थ महाराष्ट्रातील नेत्यांना या घटनेचे गांभीर्य कळलेले नाही, इतकाच होतो. महाराष्ट्रातून हा प्रकल्प जाणे, हे राज्याच्या घसरत्या प्रतिष्ठेला साजेसे असले तरी उद्या राज्यातील इतरही प्रस्तावित किंवा संभाव्य गुंतवणूक बाकीच्या राज्यांकडे वळू शकते, याचा हा इशारा आहे. तो गंभीरपणे घेण्याच्या मनस्थितीत ना महाराष्ट्रातील नेते आहेत, ना नोकरशाही आहे आणि ना सरकार नावाची अजस्र पण नाठाळ व्यवस्था आहे. आज गुजरात तर सोडाच पण दक्षिणेतील सारी राज्ये, उडिशा, उत्तर प्रदेश, बंगाल हे विकासाच्या स्पर्धेत हिरीरीने उतरले आहेत. वेदान्तच्या या प्रकल्पासाठी दक्षिणेतील राज्येही उत्सुक होती. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र खरोखरच उद्योगस्नेही उरला आहे का, हा कळीचा प्रश्न आहे.

या घडामोडींना अनेक संदर्भ आहेत. त्यात महाराष्ट्रातून केवळ उद्योगच नव्हे तर सरकारी कार्यालयेही गुजरात खेचून नेत असल्याची भावना आहे. ती योग्यच आहे. आता गुजरात विधानसभेच्या निवडणुका जवळ येत असतानाच हा मोठा प्रकल्प तिकडे गेला. मात्र, गुजरातला नावे ठेवताना तिथली कार्यसंस्कृती, निर्णयप्रक्रिया यांची दखल घ्यावी लागेल. टाटांचा सिंगूर प्रकल्प आंदोलनात फसल्यानंतर गुजरातच्या तेव्हाच्या मुख्यमंत्र्यांनी अक्षरश: २४ तासांत सारी चक्रे फिरवून टाटांना गुजरातेत नेले होते. तेव्हाही महाराष्ट्र मागे पडला. खरेतर, टाटांसाठी महाराष्ट्र हा अधिक सोयीचा व सवयीचा होता.



## आनंदी सकाळ

### ‘देंहेऽहता तदुत्था, स्वविषयममता, चेति दुःखास्पदे द्वे.’

अहंकार याचा अर्थ देहाला मी समजणे. मम आणि ममत्व म्हणजे अहंकार. आद्य शंकराचार्यांनी म्हटले आहे, ‘देंहेऽहता तदुत्था, स्वविषयममता, चेति दुःखास्पदे द्वे.’ देहाला मी समजणे ही अहंता. त्यातून माझे निर्माण झालेले विषय ममत्व हे सर्व दु:खास कारणीभूत आहे. अहंकार हा पृथ्वीतत्त्वापासून म्हणजे जड तत्त्वापासून बनला आहे. हे जडत्व काढणे अत्यंत कठीण आहे. कारण हा अहंकार कातडीप्रमाणे आपल्याला चिकटलेला आहे. तो सर्व शरीराला व्यापून आहे. परमार्थाच्या आड येणारा सगळ्यात मोठा शत्रू म्हणजे अहंकार आहे. हा अहंकार सात्विक, राजस व तामस अशा तीन रूपांमध्ये आहे. तो कुठलेही रूप घेऊ शकतो. असे म्हणतात की, ज्याप्रमाणे दीपात काजळी असतेच, त्याप्रमाणे ज्ञानात अहंकार आहे. लाकडात अग्नी सुप्तावस्थेत असतो. तो दिसत नाही, तसा अहंकार आपल्याला दिसत नाही.

# वातावरण बदलांचा सांगावा



## भूमिका



तापमानवाढीमुळे सध्या अतिवृष्टी, ढगफुटीसारख्या घटना घडत आहेत. पुणे, नाशिक, औरंगाबाद आदी ठिकाणी त्याचा वारंवार प्रत्यय येतो आहे. वातावरणातील बदलांमुळे येत्या काळात आणखी भीषण परिस्थिती निर्माण होणार असून, त्यासाठी आजच उपाययोजना सुरू केली पाहिजे...तापमानवाढीमुळे सध्या अतिवृष्टी, ढगफुटीसारख्या घटना घडत आहेत. पुणे, नाशिक, औरंगाबाद आदी ठिकाणी त्याचा वारंवार प्रत्यय येतो आहे. वातावरणातील बदलांमुळे येत्या काळात आणखी भीषण परिस्थिती निर्माण होणार असून, त्यासाठी आजच उपाययोजना सुरू केली पाहिजे...

महिनाभरापासून पाकिस्तानात धो धो पाऊस कोसळतो आहे. एक तृतीयांश पाकिस्तान महापुराने व्यापला गेला. हिमालयात उगम पावणाऱ्या नद्यांनी पुराबरोबर प्रचंड गाळ संपूर्ण प्रवाहात व आजूबाजूच्या परिसरात पसरवला आहे. यामुळे शेती, पर्यावरण आणि जनजीवन विस्कळीत झाले. भारतीय महाद्वीपात सन २००० पासून मागच्या दीडशे वर्षांत ०.६८ डिग्री सेल्सियसने तापमानात वाढ झाली, तर २०२१ ते २०३० च्या दरम्यान तापमानवाढ ०.५ डिग्री सेल्सिअसने वाढेल, असे अनुमान आहे. या शतकाच्या अखेरपर्यंत तापमानवाढ दोन ते चार डिग्री सेल्सियस असेल, असा अंदाज आहे. तापमानवाढीचे भीषण परिणाम आपण याच वर्षात अनुभवले. देशभरात तापमान वाढीमुळे यंदा गव्हाच्या उत्पादनात मोठी घट झाली. हिमालयात बर्फ वितळण्याच्या प्रक्रियेला प्रचंड वेग येत आहे. त्यामुळे कमी काळात प्रचंड पाऊस, मोठा पूर तसेच उन्हाळ्यात बाष्पीभवनाच्या प्रक्रियेत वाढ, जंगलांतील वणवे, कार्बन डायऑक्साइडची अधिक निर्मिती यांसारखे भीषण परिणाम जाणवत आहेत.

यावर्षी भारतात काही भागांत तापमान ४८ डिग्रीपर्यंत पोहोचले. दुष्काळ, पूर, शेतीचे अपरिमित नुकसान, पिकांच्या उत्पादनात घट, शेती व त्यावर अवलंबून रोजगारांत होणारी घट, शेतीतील वाढता तोटा व त्यामुळे मोठे स्थलांतर, शहरात एकदम पडणाऱ्या पावसामुळे होणारी भीषण परिस्थिती महाराष्ट्रात सांगली, कोल्हापूर, सिन्नर व त्यानंतर आता बेंगळुरूत आपण अनुभवली आहे. कमी काळात जास्त पाऊस पडल्याने भीषण परिस्थिती उद्भवते आहे. शहरातील पाणी निचरा होण्याची यंत्रणा या पावसामुळे हतबल होते. मालमत्ता, जनावरांची, शेतीची प्रचंड हानी होते. संपूर्ण मानवताच जणू पुन्हा शून्यापासून सुरुवात करते.

भारताला तर पूर, दुष्काळ या परिस्थितीचा सामना अनेक पातळीवर करावा लागेल. पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ आदी सर्व प्रदेशांतून विस्थापितांचे लोंढे या नैसर्गिक आपत्तीमुळे येत्या ५० वर्षांत भारतात येण्याची शक्यता आहे. सर्वाधिक धोका बांगलादेशापासून आहे.

# अभियांत्रिकीचा संपन्न वारसा

**इसवी सनानंतर चौदाव्या शतकापर्यंत मानव जात 'हे विश्व कुठल्यातरी अदृश्य शक्तीच्या मर्जीने चालते,' या भयाखाली होती. नंतर आधुनिक विज्ञानाची सुरुवात पश्चिमेत झाली. त्यानंतरच्या पाचशे वर्षांत जणू काही सगळे विश्व विज्ञानाच्या कब्जात आहे, अशा भ्रामक समजुतीपर्यंत येण्याचा मानवाचा प्रवास झाला.**

याच काळात विज्ञानातला प्रत्येक शोध सर्वसामान्यांच्या उपयोगासाठी परावर्तित करणाऱ्या शाखेचा जन्म झाला. ती शाखा म्हणजे अभियांत्रिकी-इंजिनीअरिंग. चाकाचा शोध लागला आणि औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली. हे युग युरोपमध्ये व त्यातही जर्मनीत उदयास आले. हे इंजिनीअरिंगचे युग होते.

सकाळी उठल्यापासून वापरली जाणारी प्रत्येक गोष्ट अभियांत्रिकीच्या कृपाप्रसादाने प्राप्त झालेली असते. याची घरापासून वाहनांपर्यंत आणि महामार्गांपासून इलेक्टॉनिक वस्तूंपर्यंत असंख्य उदाहरणे देता येतील. आज ॲलोपाथीचे विज्ञान खूप पुढे गेले आहे. पण त्यातही इंजीनिअरिंगची मदत आहे. विज्ञानाने एक्स-रेचा शोध लावल्यावर अभियांत्रिकीने एक्स-रे मशीनचा शोध लावून अचूक निदानाचे एक अस्त्र ॲलोपाथीच्या हाती दिले.



त्यानंतर सिटी स्कॅन, एमआरआय अशी अस्त्रे दिली. एंडोस्कोपी, अँजिओग्राफी, इकोकार्डिओग्राफी, कम्प्युटरच्या साह्याने होणाऱ्या रक्त तपासण्या, अचूक निदानांसाठी वापरात असलेल्या सगळ्या गोष्टी अभियांत्रिकीने दिल्या आहेत. केवळ निदानच नाही तर 'कम्प्युटर एडेड की-होल सर्जरी' किंवा 'रोबोटिक सर्जरी' अशा शल्यकर्म क्षेत्रातही अभियांत्रिकी एक एक पाऊल उत्साहाने पुढे टाकते आहे.

आम्ही शिकत असताना 'मेडिकल' किंवा 'इंजिनीअरिंग' या दोनच शाखांना सगळ्यात जास्त महत्त्व होते. तेव्हा दोन्ही शाखांच्या विद्यार्थ्यांमध्ये मजेच्या भांडणाचा मुख्य मुद्दा श्रेष्ठत्वाचा असे. पण आजही प्रामाणिकपणे सांगायचे तर या दोन शाखांमध्ये श्रेष्ठत्वाचा प्रश्न मनात आला तर मला अभियांत्रिकी हीच शाखा श्रेष्ठ वाटते. असे म्हणणे धाडसाचे आहे आणि आता या करोनाच्या काळात तर मार खायला लावणारे आहे. पण तरीही मला प्रामाणिकपणे हेच म्हणावसे वाटते. मेडिकल ही शाखा आयुष्यातून वजा केली, तर समाजातल्या २० ते ३० टक्के लोकांना त्रास होईल वा प्रत्येकालाच आयुष्यात काही वेळा व शेवटच्या काळात जगायचा त्रास होईल. पण अभियांत्रिकी ही शाखा मानवी जीवनातून वजा केल्यास शंभर टक्के जनतेचे रोजचे जगणे किती कठीण होईल हे अभियांत्रिकीने दिलेल्या आयुष्यातल्या गोष्टी वजा करून पाहिल्या तर कळते.

## ।। अभंगवाणी ।।



नेणें गाणें कंठ नाहीं हा सुस्वर ।
घालूं तुज भार पांडुरंगा ॥१॥
नेणें राग वेळ काळ घात मात ।
तुझे पायीं चित्त ठेवीं देवा ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पुढील सहा महिन्यात राज्यात नवीन उद्योग येतील याची मला खात्री

। सांगली । महाईन्यूज ।



वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला गेल्यानंतर राज्यातील राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. सत्ताधारी आणि विरोधी पक्षाकडून राजकीय टीका केली जात आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी जे बोलतात त्यांच्यावर विश्वास आहे. पुढील सहा महिन्यात राज्यात नवीन उद्योग येतील याची मला खात्री आहे, असा दावा राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केला आहे.

केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी देखील राज्यात उद्योग आणण्यासाठी आम्ही समर्थ असल्याचं म्हटलं आहे. अडीच वर्षांत शरद पवारांच्या तीन पक्षांच्या राजवटीत उद्योगाला पोषक वातावरण नव्हते, म्हणून इथून उद्योग गेले आहेत. आता उद्योग गेल्यानंतर हात चोळत बसण्यात अर्थ नाही.

### ...राज्यात नवीन उद्योग येतील याची मला खात्री

**अब्दुल सत्तार यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले की, नरेंद्र मोदींवर माझा विश्वास आहे. पुढील सहा महिन्यात राज्यात नवीन उद्योग येतील याची मला खात्री आहे. हे दोन किंवा दीड महिन्यांचं सरकार नाहीये. तर मागील सरकारने अडीच वर्षांत सरकारने काय प्रयत्न केले आणि हा प्रकल्प गुजरातला कशामुळे गेला ? हे दोन्ही सरकारचे काम पाहिल्यानंतरच कळेल, असं अब्दुल सत्तार म्हणाले.**

# 'वेदान्त-फॉक्सकॉन' गुजरातला गेल्याने शिवसेनेचा संताप!

## CM शिंदेंनी अकलेची दिवाळखोरी दाखवल्याची टीका

। मुंबई । महाईन्यूज ।

'वेदान्त-फॉक्सकॉन' प्रकल्पावरुन सुरु असणाऱ्या आरोप प्रत्यारोपांदरम्यान शिवसेनेनं मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंबरोबरच भाजपाला लक्ष्य केलं आहे. मुंबई महानगरपालिका निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर मुंबईचाही संदर्भ देताना, "उद्या हे याच पद्धतीने मुंबईचादेखील सौदा केल्याशिवाय राहणार नाहीत" असा इशाराही शिवसेनेनं दिला आहे. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणामध्ये महाविकास आघाडीला दोषी ठरवत अकलेची दिवाळखोरी जाहीर केल्याचा घणाघात शिवसेनेनं केला आहे. विशेष म्हणजे शिवसेनेनं यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज



ठाकरे यांचाही उल्लेख केला आहे.

"महाराष्ट्र हे गुंतवणूकदारांच्या पसंतीचे पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. तरीही 'वेदान्त-फॉक्सकॉन' हा मोठा औद्योगिक प्रकल्प महाराष्ट्रातून खेचून गुजरातला नेल्याचे वृत्त धक्कादायक आहे. पुण्याच्या तळेगावजवळ ११०० एकर जमीन व इतर सवलती या उद्योगास देण्याचे महाविकास आघाडी सरकारने मान्यच केले होते. हा प्रकल्प महाराष्ट्रातच होईल असे कंपनीचे पक्के वचन होते. जूनपर्यंत तरी कंपनीचे मन बदलले नव्हते, पण महाराष्ट्रात एक बेकायदा सरकार विराजमान होताच किमान एक लाख लोकांना रोजगार देणारा हा प्रकल्प गुजरातला वळवला गेला आहे," असा आरोप शिवसेनेनं केला आहे. "महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेवर हा खूप मोठा हल्ला आहे. मुख्यमंत्री शिंदे यांचा नुकताच पैठण दौरा झाला. त्यांच्या गटाचे आमदार भुमरे यांचा हट्ट पुरविण्यासाठी मुख्यमंत्री पैठण यात्रेस गेले. तेथे एका मंडपात मुख्यमंत्र्यांची पेढे व लाडवांची तुला करण्याची योजना होती. त्यासाठी अनेक खोके भरून मिठाई तेथे आणली होती.

शिंदे गटाचा खोक्यांशी संबंध जोडला जात असला तरी खोक्यातली मिठाई पाहून 'तुला' करण्याचे मुख्यमंत्र्यांनी नाकारले. त्यांनी मिठाईतुला नाकारताच त्या मांडवात जमलेल्या लोकांनी लाडू-पेढय़ांची अक्षरशः लूटमार केली. लोकांनी मुख्यमंत्र्यांच्या डोळ्यांसमोर लाडू-पेढे पळवून नेले. अगदी त्याच 'लूटमार' पद्धतीने गुजरातने महाराष्ट्रातला 'वेदान्त-फॉक्सकॉन' प्रकल्प पळवून नेला आहे," अशी तुलना शिवसेनेनं केली आहे.

# पाट्या टाकण्याचे काम करू नका!

## अभियंत्यांना रवींद्र चव्हाण यांनी लगावल्या कानपिचक्या



सांगली। महाईन्यूज ।

खुर्ची मिळविण्यासाठी मला आमिष दाखवू नका. मला कोणतीही लालसा नाही. त्यापेक्षा तुम्ही बदल घडवा, विभागाचा कारभार पारदर्शी करा. आपल्या कामात पारदर्शकता आणताना चांगल्या विभागात जाण्याची स्पर्धा संपवा, स्पर्धा नाही असे जेव्हा वाटू लागेल तेव्हा जे अपेक्षित आहे ते साध्य होईल, अशा कानपिचक्या सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी गुरुवारी आपल्या विभागातील अभियंता अधिकाऱ्यांना दिल्या.

एखादा अभियंता हा त्याच्या मर्जीने नव्हे तर गुणवत्तेवर खुर्चीवर बसला पाहिजे. जो स्पर्धा टाळतो तो मागे राहतो आणि जो चुकीच्या मार्गाने येतो तो पुढे जातो. या स्पर्धेत मी जोपर्यंत मंत्रिपदावर आहे तोपर्यंत मी तुमच्या सोबत नाही, असेही चव्हाण यांनी अभियंत्यांना सुनावले. तर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मनोज सौनिक यांनी थोडी लाज बाळगा एकदम निर्लज्ज बनू नका, अशा शब्दात अभियंत्यांच्या कार्यपद्धतीबद्दल नाराजी व्यक्त केली. राष्ट्रीय अभियंता दिनाच्या निमित्ताने आज सार्वजनिक बांधकाम विभागात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या अभियंत्यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सन २०१४-१५ ते २०१८-१९ अशा पाच वर्षातील पुरस्कारांचे रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. यावेळी बोलताना चव्हाण यांनी विभागाच्या डागाळलेल्या प्रतिमेबद्दल आणि भ्रष्ट कारभाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.सार्वजनिक बांधकाम विभागात मलईदार जागेसाठी चांगलीच चुरस असते. त्याचा संदर्भ घेत चव्हाण यांनी चांगल्या ठिकाणी जाण्याची स्पर्धा करू नका, असा सल्ला अभियंत्यांना दिला. स्पर्धा कामाची किंवा एखाद्या मागास भागात जाऊन काम करण्याची असली पाहिजे. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिकांचा विभागावरील विश्वास उडाला आहे. आपण चुकत असल्यामुळे रस्त्यावर खड्डा पडून त्यात नागरिकांचा जीव जातो. आपणच आपल्यावर टीका करण्यासाठी लोकांना भाग पाडतो. हे ळण्यासाठी आपल्या कामात बदल करा. कामासाठी नव्या तंत्रज्ञानाची मदत घ्या. आपल्याला तुटपुंज्या निधीत खाते चालवायचे आहे. काटकसर करून पैसे वाचवायचे आहेत. त्यामुळे मिशन मोडवर काम करा. धूळ, फायली, पैसे, डर्टी गेम यामुळे डागाळलेली विभागाची प्रतिमा बदलण्यासाठी प्रयत्न करा, अशा सूचना रवींद्र चव्हाण यांनी केल्या. चुकीचे काम करू नका. विधिमंडळ अधिवेशनात आपल्या विभागाच्या मंत्र्याला प्रश्न विचारला जाणार नाही याची काळजी घ्या.


### नव्या संकल्पना घेऊन या : सौनिक

**काम करताना अभियंत्यांनी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करावा, असा सल्ला सौनिक यांनी यावेळी दिला. बदलीसाठी माझ्याकडे फाईल घेऊन येता तसे नव्या संकल्पनांचे प्रस्ताव घेऊन या, अशी सूचनाही त्यांनी केली.**

# सिव्हिल'मध्ये रुग्णांच्या वेदनांचा खेळ

## ऑपरेशन झालेल्या रुग्णांची कमोडअभावी अन्य वॉर्डात धाव

। नाशिक । महाईन्यूज ।



जिल्हा शासकीय रुग्णालयात शासनाकडून कोट्यवधींचा निधी येत असतानाही रुग्णांच्या जीवाशी खेळ केला जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. अतिजोखमीच्या शस्त्रक्रिया केल्यानंतर रुग्णांना मुख्य इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील पुरुष शल्यकक्षात दाखल केले जात असले तरी येथील स्वच्छतागृहाच्या दूरवस्थेमुळे रुग्णांना ओल्या जखमांच्या नरकयातना सहन करत अन्य कक्षात जावे लागते.

जिल्हा शासकीय रुग्णालयातील या गंभीर प्रकारामुळे रोगापेक्षा इलाज भयंकर अशी रुग्णांची अवस्था झाली आहे. सिव्हिलमध्ये सुरू असलेल्या अनागोंदी प्रकाराची दखल घेऊन आता मुख्यमंत्र्यांनीच न्याय द्यावा, अशी आर्त हाक रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक देत आहेत. जिल्हा रुग्णालयातील मुख्य इमारतीच्या दुसरा मजल्यावर पुरुष शल्य कक्ष आहे. या कक्षात विविध आजारांच्या रुग्णांसह अस्थीरोग रुग्णांना शस्त्रक्रिया केल्यानंतर उपचारासाठी दाखल केले जाते. या ठिकाणी रुग्णांना बेड्स, औसधोपचार दिले जातात. मात्र, प्राथमिक गरज असलेल्या स्वच्छतागृहाची प्रचंड दूरवस्था झाली आहे. स्वच्छतागृहातील टॉयलेटचे दार तुटले आहे. जे टॉयलेट उपलब्ध आहेत तेदेखील भारतीय पद्धतीची शौचालये आहेत. त्यामुळे पायासह गुडघे व खुब्याचे ऑपरेशन झालेल्या रुग्णांना या कक्षातील टॉयलेटचा वापर करता येत नाही. परिणामी, दुसऱ्या कक्षातील कमोड टॉयलेटचा वापर करावा लागत आहे. ऑपरेशननंतर जखम ओली असल्याने डॉक्टरांकडून रुग्णांना १४ दिवस कमीत कमी चालण्याचा सल्ला दिला जातो.

# "गणवेश ठरवण्याचा अधिकार कायद्यानुसार शैक्षणिक संस्थांना आहे!

## हिजाब वादावर सर्वोच्च न्यायालयाचं मत

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

काही महिन्यांपूर्वी कर्नाटकमधील काही शाळांमध्ये हिजाब बंदीवरून वाद निर्माण झाला होता. काही शाळांनी मुस्लीम मुलींना वर्गात हिजाब घालून बसण्यास मज्जाव केला होता. हा प्रकार देशभरात चर्चेचा विषय ठरला. यासंदर्भात समाजाच्या सर्वच स्तरातून संमिश्र प्रतिक्रिया उमटू लागल्या होत्या. अखेर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं असून न्यायालयानं झालेल्या सुनावणीमध्ये या प्रकरणी महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे. या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू असून पुढील सुनावणी १९ सप्टेंबर रोजी होणार आहे.

मुस्लीम मुलींना हिजाब घालण्यास बंदी केल्यामुळे त्यावरून मोठा वाद निर्माण झाला होता. शैक्षणिक संस्थांना त्यांच्या आवारत गणवेश परिधान करण्यासंदर्भात नियम बनवण्याचा अधिकार असल्याचा मुद्दा देखील अनेक संघटनांकडून उपस्थित करण्यात आला होता. हाच मुद्दा सर्वोच्च न्यायालयात देखील उपस्थित झाल्यानंतर न्यायालयानं त्यावर महत्त्वपूर्ण नोंद केली आहे. "कायदा सांगतो की शैक्षणिक संस्थांना गणवेशासंदर्भातील नियम बनवण्याचा अधिकार आहे. पण हिजाबची गोष्ट वेगळी आहे", असं मत न्यायालयानं यावेळी नोंदवलं. त्यामुळे येत्या १९ सप्टेंबर रोजी होणाऱ्या सुनावणीमध्ये यावर सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान सविस्तर भूमिका मांडली जाऊ शकते. याआधी बुधवारी झालेल्या सुनावणीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने हिजाबमुळे मुलींची संख्या घटत असल्याच्या दाव्यावर संबंधित याचिकाकर्त्यांना आकडेवारी मागितली आहे."हिजाबवरील बंदी आणि त्यानंतर आलेल्या कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे शाळांमधून २०, ३०, ४०, ५० अशा किती मुलींच शिक्षण बंद झालं, याची काही आकडेवारी तुमच्याकडे आहे का?" अशी विचारणा न्यायालयाने केली. यावर बोलताना याचिकाकर्त्यांची बाजू मांडणारे वरीष्ठ वकील हझेफा अहमदी यांनी सांगितलं की, 'माझ्या एका वकील मित्रांनी मला सांगितलं की हिजाब बंदीबाबत कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निकालानंतर जवळपास १७ हजार विद्यार्थिनी अनुपस्थित राहिल्या आहेत. कर्नाटक सरकारने काढलेल्या आदेशामुळे शिक्षणाच्या मूळ प्रवाहात असणाऱ्या मुस्लीम मुली पुन्हा एकदा मदरशांकडे परतण्याची शक्यता आहे'.



मुस्लीम मुलींना हिजाब घालण्यास बंदी केल्यामुळे त्यावरून मोठा वाद निर्माण झाला होता. शैक्षणिक संस्थांना त्यांच्या आवारत गणवेश परिधान करण्यासंदर्भात नियम बनवण्याचा अधिकार असल्याचा मुद्दा देखील अनेक संघटनांकडून उपस्थित करण्यात आला होता. हाच मुद्दा सर्वोच्च न्यायालयात देखील उपस्थित झाल्यानंतर न्यायालयानं त्यावर महत्त्वपूर्ण नोंद केली आहे. "कायदा सांगतो की शैक्षणिक संस्थांना गणवेशासंदर्भातील नियम बनवण्याचा अधिकार आहे. पण हिजाबची गोष्ट वेगळी आहे", असं मत न्यायालयानं यावेळी नोंदवलं.

## शॉर्ट न्यूज »

### गोव्यातील काँग्रेस फुटीवरून 'चिखलफेक'



।नवी दिल्ली।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

गोव्यातील काँग्रेसच्या ११पैकी ८ आमदारांनी पक्षाला सोडचिठ्ठी देऊन भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर राजकीय 'चिखलफेक' सुरू झाली आहे. गोव्यातच नव्हे तर, भाजपने पंजाबमध्येदेखील 'आप'चे आमदार फोडण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप दिल्लीचे मुख्यमंत्री आणि 'आप'चे सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांनीही केला आहे. माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्यासह ८ काँग्रेस आमदारांनी बुधवारी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. त्यावर, 'ही काँग्रेस छोडो यात्रा असून त्याची सुरुवात गोव्यामधून झाली आहे', अशी प्रतिक्रिया सावंत यांनी दिली आहे. त्यावर, काँग्रेसने आक्रमक शाब्दिक हल्लाबोल केला.

# "...तर मला सोमवारपर्यंत अटक करावी नाही तर सोमवारी पंतप्रधानांनी माझी माफी मागावी";

## दिल्लीच्या उपमुख्यमंत्र्यांचं थेट आव्हान

**गुजरातमध्ये रणधुमाळी सुरु असताना दुसरीकडे दिल्लीमध्येही दिल्ली सरकारच्या उत्पादन शुल्क धोरणातील (मद्यविक्री धोरण) कथित गैरव्यवहारांप्रकरणी भाजपा आणि आप आमने-सामने आल्याचं चित्र पहायला मिळत आहे. दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या निवासस्थानासह सात राज्यांतील २१ ठिकाणी १९ ऑगस्ट रोजी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) छापे टाकले होते. या छाप्यांमुळे दिल्लीत खळबळ माजली असून आम आदमी पक्ष (आप) आणि भाजप यांच्यातील राजकीय लढाई तीव्र झाल्याचं पहायला मिळालं होतं. आता याच छाप्यांचा संदर्भ देत मनीष सिसोदियांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपली माफी मागावी असं म्हटलं आहे.**

।नवी दिल्ली
।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

गुजरातमधील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी विरुद्ध आम आदमी पार्टी असा संघर्ष शिगेला पोहोचल्याचं चित्र पहायला मिळत आहे. गुजरातमध्ये आपची सत्ता येणार असा विश्वास पक्षाचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी व्यक्त केला आहे. एकीकडे गुजरातमध्ये रणधुमाळी सुरु असताना दुसरीकडे दिल्लीमध्येही दिल्ली सरकारच्या उत्पादन शुल्क धोरणातील (मद्यविक्री धोरण) कथित गैरव्यवहारांप्रकरणी भाजपा आणि आप आमने-सामने आल्याचं चित्र पहायला मिळत आहे. दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या निवासस्थानासह सात राज्यांतील २१ ठिकाणी १९ ऑगस्ट रोजी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) छापे टाकले होते. या छाप्यांमुळे दिल्लीत खळबळ माजली असून आम आदमी पक्ष (आप) आणि भाजप यांच्यातील राजकीय लढाई तीव्र झाल्याचं पहायला मिळालं होतं. आता याच छाप्यांचा संदर्भ देत मनीष सिसोदियांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपली माफी मागावी असं म्हटलं आहे.

मनीष सिसोदीया यांनी भाजपा माझ्याविरोधात स्टिंग ऑप्रेशन करत असल्याचा आरोप केला आहे. यावेळी सिसोदीया यांनी



सीबीआयच्या छाप्यांचाही संदर्भ दिला आहे. "सीबीआयने माझ्या घरावर छापे मारले. त्यांना काही सापडलं नाही. त्यांना तिजोऱ्यांमध्येही काही सापडलं नाही. आता भाजपा स्टिंग ऑप्रेशनच्या माध्यमातून मला लक्ष्य करत आहे. सीबीआय आणि ईडीने स्टिंग ऑप्रेशनचीही चौकशी करावी," असं सिसोदिया ट्वीटमध्ये म्हणाले आहेत. दिल्लीमध्ये अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील सरकारने नोव्हेंबर महिन्यामध्ये नवे उत्पादन शुल्क धोरण लागू केले होते. या धोरणाअंतर्गत मद्यविक्रीचा परवाने खासगी ठेकेदारांना देण्यात आले. मात्र आठ महिन्यांनंतर म्हणजेच ३० जुलै रोजी हे धोरण मागे घेण्यात आले. त्यानंतर या मद्यविक्री धोरणामध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप दिल्ली विधानसभेत विरोधी पक्ष असणाऱ्या भाजपने केला. दिल्लीच्या मुख्य सचिवांनी अहवाल सादर केला. त्यानंतर नायब राज्यपाल विनय सक्सेना यांच्या आदेशानुसार या प्रकरणी 'सीबीआय'ने सिसोदिया यांच्यासह १६ जणांविरोधात गुन्हे दाखल केले.

याप्रकरणी १९ ऑगस्टपासून चौकशी सुरू करण्यात आली आहे. नवे उत्पादन शुल्क धोरण निश्चित करणाऱ्या या विभागातील माजी आयुक्तांसह काही अधिकाऱ्यांच्या निवासस्थानी छापेमारी करण्यात आली होती. या प्रकरणामुळे चर्चेत असणारा उत्पादन शुल्क विभाग उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या अखत्यारित येतो. याच कारणामुळे त्यांच्या निवासस्थानीही छापेमारी करण्यात आली होती.

# प्राजक्ता माळीने व्यक्त केली चंद्र- मंगळ, अंतराळ बघण्याची इच्छा



'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमातून प्रसिद्धीझोतात आलेली अभिनेत्री म्हणून प्राजक्ता माळीला ओळखले जाते. ती लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. तिने अभिनयाच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनात एक वेगळेच स्थान निर्माण केले आहे. 'जुळून येती रेशीमगाठी', 'नकटीच्या लग्नाला यायचं हं' यांसारख्या प्रसिद्ध मालिकेतील तिच्या भूमिका आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहेत. सध्या प्राजक्ता ही लंडन दौऱ्यावर गेली आहे. याचे अनेक फोटो आणि व्हिडीओ तिने सोशल मीडियावर शेअर केले आहेत. त्यानंतर आता तिने तिच्या आंतरराष्ट्रीय दौऱ्याच्या निमित्ताने एक खास पोस्ट शेअर केली आहे.

मराठमोळी अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने नुकतंच इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये तिने ती तिच्या आगामी चित्रपटाच्या शूटींगसाठी लंडनमध्ये गेल्याचे सांगितले आहे. त्यानंतर आता प्राजक्ताने इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला आहे. यात तिने तिच्या जुन्या आठवणी जाग्या केल्या आहेत. या व्हिडीओद्वारे तिने तिची एक इच्छा देखील बोलून दाखवली आहे. तिचा हा व्हिडीओ आणि कॅप्शन चर्चेचा विषय ठरत आहे. दरम्यान प्राजक्ता माळी ही गेल्या काही दिवसांपासून रानबाजार या वेबसीरिजमुळे चर्चेत आहे. इतकंच नव्हे तर ती कंट्रोल एन प्रॉडक्शन निर्मित वाय चित्रपटात झळकली होती. त्यानंतर आता ती आणखी एका चित्रपटाद्वारे प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. याचे नाव, स्टार कास्ट याबद्दल कोणतीही माहिती समोर आलेली नाही.

# 'या'साठी सुमंत शिंदेने घेतली विशेष मेहनत


'बॉईज', 'बॉईज २' मधील धैर्या, ढुंग्या आणि कबीर या तिकडीने अवघ्या महाराष्ट्राला वेड लावले. आता पुन्हा एकदा हे तिघे हीच धमाल तिप्पटीने करायला सज्ज झाले आहेत. विशाल देवरूखकर दिग्दर्शित 'बॉईज ३'ची सध्या सर्वत्र जोरदार चर्चा आहे. चित्रपटातील गाणीही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत आहेत. या सगळ्यात आणखी एक विषय विशेष गाजत आहे तो म्हणजे कबीरची कुस्ती. यात कबीर खऱ्याखुऱ्या पैलवानांबरोबर कुस्ती खेळला आहे. कोणतीही भूमिका साकारताना त्यासाठी त्याची तयारी, अभ्यास हा करावा लागतोच. खऱ्या पैलवानांबरोबर



कुस्ती खेळणे कबीरसाठी म्हणजेच सुमंत शिंदेसाठीही निश्चितच आव्हानात्मक होते. मात्र यासाठी त्याने बरीच मेहनत घेतली आणि त्याच्या या मेहनतीचे चीज झाले. अर्थात यात त्याला ॲक्शन दिग्दर्शकांची बरीच मदत झाली. सुमंत शिंदेच्या मेहनतीबद्दल दिग्दर्शक विशाल देवरूखकर म्हणतात, " कुस्ती म्हणजे महाराष्ट्राची शान. कथेचा भाग म्हणून आम्ही कुस्तीचा समावेश केला. हे वास्तववादी वाटावे, म्हणून यासाठी आम्ही खरे पैलवान घेतले. या पैलवानांबरोबर कबीरला कुस्ती खेळायची होती. कबीरसाठी हे जरा कठीण होते मात्र यातील बारकावे जाणून घेऊन तो त्या पैलवानांसमोर अगदी आत्मविश्वासाने उभा राहिला आणि यात त्याला साथ लाभली ती ॲक्शन डिरेक्टरची. कारण दोन अशा व्यक्तींना समोर आणायचे होते, ज्यातील एक कुस्तीत तरबेज आहे आणि दुसरा असा ज्याला कुस्तीची काहीच पार्श्वभूमी नाही. त्यामुळे त्यांच्यात योग्य सांगड घालण्याचे काम ॲक्शन डिरेक्टरने केले. पैलवान कबीरला उचलून जमिनीवर आदळतो. फेकण्याचा वेग पाहता जराही चूक झाली असती तर कबीरला दुखापत होऊ शकली असती. मात्र याचाच ताळमेळ ॲक्शन डिरेक्टरने उत्तम साधला आहे. हा अगदी छोटासा सीन आहे पण त्यामागची मेहनत प्रचंड आणि ही मेहनत प्रेक्षकांना पडद्यावर दिसेलच."सुप्रीम मोशन पिक्चर्स प्रा. लि. प्रॉडक्शन अंतर्गत एव्हरेस्ट एंटरटेनमेंटसह अवधूत गुप्ते प्रस्तुत या चित्रपटाच्या निर्मितीची धुरा लालासाहेब शिंदे, राजेंद्र शिंदे, संजय छाब्रिया यांनी सांभाळली आहे. 'बॉईज ३'मध्ये पार्थ भालेराव, प्रतीक लाड, सुमंत शिंदे यांच्यासह विदुला चौगुले प्रमुख भूमिकेत दिसणार आहे.

# "आधी तुम्ही..." अभिनेत्री तापसी पन्नूचा पत्रकारांवर संताप,

अभिनेत्री तापसी पन्नू ही बॉलिवूड लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. आज चित्रपटसृष्टीत तिने स्वतःचे स्थान कमावले आहे. अलिकडेच तिचा 'दोबारा' हा चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित झाला होता, परंतु या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवर फारसे यश मिळाले नाही. चित्रपटालादेखील बॉयकॉट या हॅशटॅगचा सामना करावा लागला होता. हा चित्रपट अनुराग कश्यपने दिग्दर्शित केला होता आणि ५० कोटी या चित्रपटाचं बजेट होतं. तापसी पन्नू कायमच चर्चेत असते. स्वतःची मतं ती कायमच परखडपणे मांडत असते. काही दिवसांपूर्वी दिलेल्या एका मुलाखतीत अनुराग आणि तापसी यांनी त्यांच्या आगामी चित्रपट 'दोबारा'ला प्रेक्षकांनी बॉयकॉट करावं अशी विनंती केली होती. त्या दोघांचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला होता. त्यावरून तिला ट्रोलदेखील करण्यात आलं होत. नुकतीच तिने ओटीटी प्ले अवॉर्ड्स या कार्यक्रमामध्ये आपली हजेरी लावली होती. रेड कार्पेटवरून जात असताना पत्रकारांनी तिच्याशी संवाद साधला होता.



# 'भाऊबळी'मध्ये झळकणार विनोदवीरांची फौज

## 50 हून अधिक कलाकार प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी सज्ज!

पुणे: नेहमीच सर्वोत्तम मनोरंजनाचा आशय देणारे झी स्टुडिओज पुन्हा एक दर्जेदार आणि जबरदस्त चित्रपट घेऊन प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन करण्यासाठी सज्ज झाले असून समीर पाटील दिग्दर्शित 'भाऊबळी' हा एक धमाल विनोदी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. प्रासंगिक विनोदावर आधारित या चित्रपटाची खासियत म्हणजे, ५० हून अधिक नामवंत कलाकारांची तगडी फौज या चित्रपटाला लाभली असून प्रेक्षकांना विनोदाचा तुफान धमाका यात अनुभवायला मिळणार हे नक्की! किशोर कदम, मनोज जोशी, मेधा मांजरेकर, ऋषिकेश जोशी, रेशम टिपणीस, प्रियदर्शिनी इंदलकर, आशय कुलकर्णी, संतोष पवार, तुषार घाडीगावकर, शार्दूल सराफ, सचिन भिलारे, आनंद अलकुंटे, विश्वास सोहनी, रसिका आगाशे, विजय केंकरे, श्रीकर पित्रे असे चित्रपटसृष्टीतील कसलेले, लोकप्रिय कलाकार प्रेक्षकांना खदखदून हसवण्याकरता येणार असून आपल्या भन्नाट विनोदशैलीने प्रत्येक व्यक्तिरेखा काही नवीन शिकवण देऊन जाईल. वास्तववादी असणाऱ्या या





चित्रपटाचे निर्माते नितीन वैद्य, निनाद वैद्य आणि अपर्णा पाडगावकर आहेत.
दोन वेगळ्या जीवनशैलीचे लोक जेव्हा समोरासमोर येतात, तेव्हा त्यांच्यात होणारे मतभेद, कलह, संघर्ष आणि त्यातून निर्माण होणारी सूड भावना या चित्रपटात अगदी हलक्याफुलक्या विनोदी पद्धतीने दाखवण्यात आली आहे. प्रत्येक वयोगटातील प्रेक्षकांना १६ सप्टेंबर रोजी प्रदर्शित होणारा हा चित्रपट प्रेक्षकांना खळखळून हसवण्यात नक्कीच यशस्वी होईल!



## शॉर्ट न्यूज »

### पाकिस्तानी पंच असद रौफ यांचे निधन



**नवी दिल्ली । महाईन्यूज**

२००६ ते २०१३ या कालावधीत ICC च्या खास पॅनेलचा भाग असलेले माजी पाकिस्तानी पंच असद रौफ यांचे लाहोरमध्ये हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ६६ वर्षांचे होते. याबद्दल पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाचे प्रमुख रमीज राजा यांनी ट्विट करून माहिती दिली. “असद रौफ यांच्या निधनाबद्दल ऐकून दुःख झाले. केवळ एक चांगला पंच नव्हे तर त्यांच्या मिश्किल व मस्तमौला स्वभावाने प्रत्येक भेटीत माझ्या चेहऱ्यावर हास्य कायम असायचे” असे म्हणत रमीज यांनी रौफ यांच्या आठवणींना उजाळा दिला. रमीज यांच्यासह अन्यही पाकिस्तानी क्रिकेट क्षेत्रातील दिग्जजांनी रौफ यांना श्रद्धांजली वाहिली आहे.त्यामुळे त्यांच्या ‘बीसीसीआय’मधील अस्तित्वाचा प्रश्न उपस्थित झाला. त्यामुळेच ‘बीसीसीआय’ने विरामकाळ, परस्पर हितसंबंध आणि अपात्रेच्या नियमात बदल करण्यासाठी न्यायालयात परवानगी मागितली होती.

### भारत-इंग्लंड ट्वेन्टी-20 मालिका :

# भारताच्या विजयात मानधनाची चमक !

## इंग्लंडवर आठ गडी राखून मात; मालिका बरोबरीत

**।डर्बी । महाईन्यूज ।**



सलामीवीर स्मृती मानधनाच्या (५३ चेंडूंत ७९ धावा) आक्रमक अर्धशतकी खेळीच्या जोरावर भारतीय महिला संघाने दुसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यात इंग्लंडवर आठ गडी आणि २० चेंडू राखून विजय मिळवला आणि मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. उभय संघातील तिसरा आणि अंतिम ट्वेन्टी-२० सामना गुरुवारी होणार आहे.

इंग्लंडने दिलेल्या १४३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात चांगली झाली. शेफाली वर्मा (१७ चेंडूंत २० धावा) आणि मानधनाने ५५ धावांची सलामी दिली. शर्माला सोफी एक्लेस्टनने बाद करत ही भागीदारी मोडीत काढली. मैदानात आलेल्या डी. हेमलताला (९) जास्त काळ टिकाव धरता आला नाही. यानंतर कर्णधार हरमनप्रीत कौरच्या (२२ चेंडूंत नाबाद २९ धावा) साथीने मानधनाने आपला आक्रमक खेळ सुरूच ठेवत तिसऱ्या गडय़ासाठी निर्णायक अर्धशतकी भागीदारी रचली आणि संघाला १६.४ षटकांत २ बाद १४६ धावसंख्येपर्यंत पोहोचवत विजय मिळवून दिला. त्यापूर्वी, प्रथम फलंदाजीस उतरलेल्या यजमान इंग्लंडने फ्रेया केम्प (३७ चेंडूंत नाबाद ५१ धावा) आणि माइआ बाऊचिर (२६ चेंडूंत ३४ धावा) यांच्या खेळीमुळे निर्धारित २० षटकांत ६ बाद १४२ धावसंख्येपर्यंत मजल मारली.

# जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा : विनेशला कांस्य

**।बेलग्रेड । महाईन्यूज ।**

भारताच्या ऑलिम्पिक पदकविजेत्या विनेश फोगटने (५३ किलो) जागतिक स्पर्धेत बुधवारी कांस्यपदकाची कमाई केली. यंदाच्या स्पर्धेतील हे भारताचे पहिलेच पदक ठरले. पात्रता फेरीतील पराभवानंतरही मिळालेली संधी विनेश फोगटने अचूक साधली. याशिवाय निशा दहियाला (६८ किलो) अंतिम फेरी गाठण्यात अपयश आले.

विनेशने पात्रता फेरी गमावल्यानंतरही कांस्यपदकाच्या लढतीपर्यंत मजल मारली. मंगोलियाच्या खुलन बटखुयागकडून तिला पराभव पत्करावा लागला होता. खुलनने अंतिम फेरीपर्यंत धडक मारल्यामुळे रेपिचेज गटातून विनेशचे आव्हान कायम राहिले. रेपिचेज गटात अझरबैझानच्या लैला गुरबार्नोवियाने दुखापतीमुळे तिला पुढे चाल मिळाली. कांस्यपदकाच्या लढतीत विनेशने स्वीडनच्या बलाढय़ एम्मा माल्मर्गेनचा ८-० असा पराभव केला. एम्माने विनेशविरुद्ध दुहेरीपटाचे आक्रमण केले होते. मात्र, त्यास दाद न देता विनेशने एक चाक डावावर दोनदा दोन गुणांची कमाई केली. त्यानंतर दुहेरी पटाचा डाव टाकून तिने आणखी दोन गुणांची कमाई केली. अखेरच्या टप्प्यात बगलडूब डाव टाकून विनेशने एम्माला निष्प्रभ केले. या डावावर विनेशने आणखी दोन गुणांची कमाई करून कांस्यपदकावर मोहोर उमटवली.



महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही